PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 2

# चारीमेरा : कादंबरीचा एक शोध



**नयना सूर्यकांत लोखंडे**
डी.एस. हायस्कूल, मुंबई - ४०००२२
महाराष्ट्र भारत

**प्रास्ताविक :**




ग्रामीण साहित्यकारांच्या तिसऱ्या पिढीतील लेखक सदानंद देशमुख यांनी बदलत्या सामाजिक वास्तवावर प्रखर भाष्य करून कृषीनिष्ठ मुल्यजाणिवा आपल्या साहित्यातून व्यक्त केल्या आहेत. सदानंद देशमुख यांनी आपल्या वाङ्मयीन वाटचालीमध्ये कथा, कविता, कादंबरी, ललित निबंध असे विविध साहित्यप्रकारात लेखन कलेले आहे. त्यांचे आतापर्यंत तहान (१९९८), बारोमास (२००२), चारीमेरा (२०१६), या कादंबऱ्या, अंधारबन (१९८८), लचांड (१९९३), उठावण (१९९४), महालूट (१९९५), रगडा (२००६), खुंदळघास (२००८), गाभुळगाभा (२०१३), इत्यादी कथासंग्रह, गावकळा (२००५), हा कवितासंग्रह, भुईरिंगणी (२००८), हा ललितलेखसंग्रह इत्यादी साहित्य प्रकाशित झाले आहेत.

सदानंद देशमुख यांच्या साहित्याची भूमी ही विदर्भ, बुलढाणा जिल्हा या भागातील आहे. तेथील कृषीसंस्कृती, शेतकऱ्यांच्या वेदना, व्यथा, समस्या तसेच कृषीपरंपरा यांचे संचित त्यांच्या साहित्यातून आले आहे. 'हा त्यांच्या साहित्याचा मुख्य केंद्रबिंदू

असल्याने त्यांच्या समस्या, व्यथा, वेदना, व कष्टमय जीवनसंघर्ष त्यांच्या तहान, बारोमास, व चारीमेरा या कादंबऱ्यातून व्यक्त झाला आहे.

जागतिकीकारणामुळे बदलेल्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण ‘चारीमेरा’ या कादंबरीतून दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात जागतिकीकारणामुळे खाऊजा संस्कृती उदयास आली. तसेच हाराकीमुळे शेतीचा विकास झाला. शेतीव्यवसायात यांत्रिकीकरण असल्यामुळे त्याचा परिणाम बदलत्या समाजव्यवस्थेत झाला. माणसातील माणुसकी संपून आत्मीयता व विश्वास याची जागा व्देषभाव व लुटमार यांनी घेतली. शेतीचा अन्य मार्गांनी विचार केला जाऊ लागल्यामुळे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग न निवडता सकारात्मक दृष्टिकोनातून विचार केला तर तो सुखी होऊ शकतो हा संदेश चारीमेरातून सदानंद देशमुखांनी वाचकांना दिलेला आहे.

**कादंबरीचे आशयसूत्र :**

अस्मानी व सुल्तानी संकटांना न घाबरता सकारात्मक दृष्टीने विचार केला तर शेतकरी सुखी होऊ शकतो या विचारावर चारीमेराचे आधारित कथानक आहे. या कादंबरीचे आशयसूत्र उदेभान या सुशिक्षित शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित आहे. सधन कुटुंबातील उभेदान आपल्या आईवडिलांच्या आजारपणामुळे अतिशय बिकट परिस्थितीत शिक्षण घेतो. बी.एस्सी. कृषीशास्त्रात पदवी घेतो व पेरत गावात येऊन शेती करण्याचा निर्णय घेतो. आपल्या पहिल्या प्रेमप्रकरणात अयशस्वी झालेला उदेभान भावनाताईशी लग्न करून शेतीव्यवसाय सुरु करतो. पाणीटंचाईवर मात करून बोअरवेल खोदण्याचा विचार करतो परंतु त्यात त्याला अपयश येते. बँकेकडून कर्ज काढून ट्रॅक्टरचा जोडधंदा करण्याचा निर्णय घेतो. परंतु ट्रॅक्टर नादुरुस्त होतो. त्यामुळे आर्थिक टंचाई मध्ये सापडलेल्या उदेभानला सुधाकर पसरटे के.डी.ला भेटण्याचा सल्ला देतो. के.डी. गावातील प्रतिष्ठित उद्योगपती त्याला ट्रक्टर विकून तुतीचा रेशीम

उद्योग सुरु करण्याचा सल्ला देतो. के.डी.च्या सल्ल्यानुसार उदेभान ट्रॅक्टर विकून रेशीमचा उदयोग सुरु करण्याचा निर्णय घेतो.

आपल्या घरातील संकटे दूर करण्यासाठी भावनाताई अंधाश्रद्धेने शादेबुवाच्या नादी लागून एकवीस महिने एकवीस दिवसाची संसारबंदी अंगिकारते .त्या दरम्यान तिला उदेभानची डायरी सापडते. ती वाचल्यावर तिला आपली चूक उमजते व ती उदेभानला सुळखडीवर विहीर खोदण्याचा सल्ला देतो. उदेभान सुळखडीवर विहीर खोदून ते पाणी चिकणीच्या शेतात फिरवतो व तुतीची झाडे लावतो. पारंपरिक शेतीचा नाद सोडून रेशीम उदयोग सुरु केल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारते. गावातील इतर होतकरू शेतकऱ्यांना या उदयोगात सामील करून ‘सोनाळा तुती लागवड व रेशीम उदयोग प्रगतिशील शेतकरी संघाची स्थापना करून सुखी जीवन जगतो.

**कादंबरीतील सकारात्मक दृष्टिकोन :**

चारीमेरा या कादंबरीतील उदेभान समस्याग्रस्त शेतकरी असून आर्थिक टंचाईने त्रस्त असतो. पाणीटंचाई कर्ज बाजारीपणा, नादुरुस्त ट्रक्टर, वुवाबाजी यामुळे त्रस्त झालेला उदेभान केडीची भेट घेतो. आपल्या मनात आलेले ताणतणाव तो विसरतो. केडीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपल्या शिक्षणाने व हुशारीने प्राप्त केलेले वैभव पाहून उदेभानला एक सकारात्मक ऊर्जा मिळते. व तो आर्थिक टंचाईतून बाहेर पडतो. व स्वतःची प्रगती करून घेतो. शिवाय आपल्यासारख्या इतर शेतकऱ्यांचा उद्धार करतो. त्यामुळे बदलत्या सामाजिक परिस्थितीप्रमाणे समाजाला परिवर्तनाची दिशा दाखवणे महत्वाचे आहे. प्रत्येकाकडे ही सामाजिक हिताची भावना असायला हवी हे उदेभानच्या व्यक्तिरेखेतून प्रकर्षाने दिसून येते.

**कादंबरीतील व्यक्तिरेखा** :

कादंबरीच्या रचनेचा व्यक्तिरेखा हा अत्यंत महत्वाचा घटक असतो. लेखक हा व्यक्तिरेखेच्या माध्यमातूनच त्याचा दृष्टिकोन, कादंबरीची जडणघडण त्याचे परिसर कुटुंबातील स्थान त्याचाभोवतीचे सामाजिक, सांस्कृतिक, वातावरण इतर घटना यातूनच कादंबरीचा विकास किंवा ऱ्हास याबाबतीत व्यक्तिरेखांची मांडणी महत्वाची ठरते.

चारीमेरा कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखा उदेभान आहे. एक सधन शेतकरी असूनही शेतीच्या यांत्रिकीकारणामुळे व अस्मानी संकटामुळे त्रस्त झालेल्या शेतकरांच्या व्यथा मांडणारी प्रातिनिधिक स्वरूपाची उदेभानची व्यक्तिरेखा या कादंबरीत सदानंद देशमुखांनी मांडली आहे. सुशिक्षित शेतकरी उदेभान आपल्या वडीलोपार्जित शेतात राबण्याचा निर्णय घेतो. परंतु शेतीव्यावसायतील समस्या पाणीटंचाई, कर्ज, नापिकी, लोडशेडिंग, शेतीमजुरांची कमतरता यामुळे तो गांजलेला आहे. त्यातच आपल्या भित्र्या, अंधश्रद्धाळू पत्नीमुळे त्याला वैवाहिक जीवनही आनंदाने जगता येत नाही. उदेभानच्या व्यक्तिरेखेतून सुशिक्षित शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती सोडून नवीन पर्यायाचा विचार करावा. शेतीची अन्य मार्गानेही उपयोग होऊ शकतो म्हणून आत्महत्या न करता आपल्या समस्या दूर करता येतात ही सकारात्मक बाब यशस्वीपणे वाचकांपर्यंत पोहचाविण्याचा प्रयत्न केला आहे.

गौण व्यक्तिरेखेमध्ये भावना, रतिरामबुवा, केडी, बादशाराव, रोशानबाय, प्रवीणा, कलानाथ गोंजारी, किरण माने, सुधाकर पसरटे, मथुरा द्वारका आत्या अशा काही व्याक्तिरेखांचा मोठा समूह आहे. ग्रामीण परिसरातील एक भाग म्हणून प्रत्येक व्यक्तिरेखा कादंबरीत महत्वाची आहे. एकूणच सदानंद देशमुख यांच्या 'चारीमेरा' या कादंबरीत आलेल्या महत्वाच्या व गौण व्यक्तिरेखेच्या या समूहासह येतात. त्यामुळे या सर्वच महत्वाच्या आहेत.

**कादंबरीचे मूल्यमापन:**

उदेभान स्वतः सुशिक्षित शेतकरी असूनही शेती करण्याचा निर्णय घेतो. परंतु शेतीव्यवसायातील अनेक समस्यांनी त्रस्त होऊन त्याला आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागते. त्यात त्याची पत्नी, भावना भित्र्या स्वभावाची व अंधश्रद्धाळू असल्याने त्यांच्या मनाची घुसमट होते. आपल्या भूतकाळातील पहिल्या प्रेमाची असफलता यामुळे उदेभानच्या मनाचा होणारा कोंडमारा, क्षणभंगूर सुखाची लालसा, विविध ताणतणाव यांचे लक्षवेधी चित्रण या कादंबरीत सदानंद देशमुखांनी केले आहे. यांत्रिकीकरणामुळे गावगाडा पद्धत मागे सरकताना दिसते यांची खंत सदानंद देशमुख या कादंबरीत व्यक्त करतात. विदर्भातील शेतकरी अवकाळी पाऊस व दुष्काळ यांनी बेजार झालेला असून शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग न स्विकारता सकारात्मक भावनेने संकटांवर मात करावी असा संदेश या कादंबरीतून सदानंद देशमुख समाजाला देतात व शेतकऱ्यांच्या आत्महत्या या ज्वलंत सामाजिक समस्येकडे आपले लक्ष वेधून घेतात. या वास्तवतेच्या जोडीला या कादंबरीत कलात्मक संघर्ष आहे. शेतीच्या दुर्देशेमागचे आर्थिक राजकारण, परिवर्तनशील समाजातील परंपरा व नवीन युगातील आधुनिकता यांच्यातील संघर्ष वाचकांना विचारप्रवृत्त करतो.

सध्याच्या शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या ज्वलंत प्रश्नांबाबत विचार करायला लावणारी व शेतकऱ्यांना सकारात्मक दृष्टीने विचारप्रवृत्त करणारी ही कादंबरी आहे व यातच या कादंबरीचे वेगळेपण आहे असे म्हणता येईल ही कादंबरी म्हणजे बारोमास कादंबरीचा पुढचा भाग आहे. पडझड झालेला शेतकरी प्रयोगशील होऊन आपली प्रगती करून आत्महत्येपासून परावृत्त व्हावा असा संदेश देणाऱ्या या कादंबरीत लेखकाची सामाजिक हिताची तळमळ दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) सदानंद देशमुख, चारीमेरा पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २०१६.
२) चारीमेरा 'लक्षवेधी पुस्तके', ललित सेप्टेंबर २०१६, पुष्ठ - ३९ ते ४१.